सायं. दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
Mo-9422404740

## गढूळ पाणी पाजून नगरपरिषदला शहराची लोकसंख्या कमी करायची आहे का ? :- शेख युनूस



बीड (प्रतिनिधी)

बीड शहरात जवळजवळ चोहीकडे गढूळ पाण्यामुळे अतिसार, कॉलरा , टाइफाइड, कावीळ सारखे अनेक गंभीर आजार होत आहे. त्याचप्रमाणे ताप,डोकेदुखी आणि पोट दुखी पण वाढलेली आहे. पाण्यामुळे आजारांना सामोरे जावे लागत आहे. जाणून बुजून पाणी पुरवठा विभाग दुर्लक्ष करीत आहे. आणि नागरिकांच्या आरोग्याशी खेळत आहे. आणि यासाठीचे नागरिकाकडून म्हणले जात आहे की गढूळ पाणी पाजून बीडची लोकसंख्या कमी करायची की काय असा प्रश्न जनतेला पडलेला आहे. याकडे सर्वप्रथम नगरपरिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नीताताई अंधारे मॅडम आपण लक्ष दिले पाहिजे. तसेच पाणीपुरवठा विभाग याला जिम्मेदार आहे. बरेच जाग्यावर पाईपलाईन फुटलेली आहे त्यामुळे नालीचे पाणी पण येत आहे.शहरातील लोकसंख्या कमी करायची आहे की काय असा प्रश्न जनतेकडून होत आहे.

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | द्विभाषिक | वर्ष ०२ अंक - १८७ मंगळवार, दि.१५ जुलै २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 Issue - 187 Teusday, Dt.15 July 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4

# आमदार संदीप क्षीरसागर यांनी लक्षवेधी मांडत भ्रष्टाचाऱ्यांचे फाडले बुरखे

विश्वनायक न्यूज

बीड नगरपरिषदेत भूमाफिया आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने सरकारी जमीन लाटण्याचा महाघोटाळा थेट महाराष्ट्र विधानसभेत गाजला. आ. संदीप क्षीरसागर यांनी या प्रश्नावर लक्षवेधी मांडत नगरपरिषद प्रशासनातील भ्रष्ट अधिकाऱ्यांचे बुरखे फाडले आणि भूमाफियांचे रॅकेट सभागृहात उघड केले.

आ.क्षीरसागर भर सभागृहात म्हणाले, नगरपरिषदेचे अधिकारी आणि भूमाफिया हातमिळवणी करून सरकारी, आरक्षित भूखंड बेकायदा विकत आहेत. खेळाचे मैदान, शाळा, रस्ते, सामाजिक उपयोगासाठीची जागा ही सर्वसामान्यांची मालमत्ता आहे. ती काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या बापाची नाही. संदर्भासह ठोस आकडे व नावांसह गंभीर आरोप मांडताना क्षीरसागर म्हणाले की, सर्वे नं. २९ (माळी), १९४, १९७, १९८, १९९ (बलगुजर), खोड सारडा रेसिडेन्सी.सर्वे नं. ३४, ३५, ६८, ६९, ७९ (गिराम), १७३ (बलगुजर). सर्वे नं. ५३, ५६, ५९, १८८ (पिंगळे), १६, १७ (देशमुख), १५१, १५२ (बोबडे). या ठिकाणी आरक्षित भूखंड बेकायदा विकले, चुकीचा लेआउट मंजूर करून आरक्षित जागा गिळंकृत केली. शासनाच्या धोरणांना हरताळ फासून सार्वजनिक हिताला सुरुंग लावला. लहान मुलांसाठी मैदान, शाळा, आरोग्य सुविधा, सार्वजनिक जागा यासाठी आरक्षित भूखंडांवर जागा विकण्याचा उद्योग नगरपरिषदेत चालू आहे, असा अत्यंत गंभीर आणि वास्तव आरोप आमदार संदीप क्षीरसागर यांनी केला.यावेळी आमदार क्षीरसागर यांनी थेट मागणी केली की, या गुंतागुंतीत अधिकारी, कर्मचाऱ्यांची नावे जाहीर व्हावीत. त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल व्हावेत. भूमाफियांना संरक्षण देणाऱ्या लोकांची हकालपट्टी व्हावी. शासनाची फसवणूक झालेल्या भूखंडांची मालकी शासनाकडे परत आणावी, अशा विविध मागण्या त्यांनी यावेळी केल्या.आमदार क्षीरसागर यांनी मांडलेल्या या लक्षवेधीनंतर राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांनी याचे उत्तर दिले. या प्रकरणाचे गांभीर्य पाहता नगर विकास राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांनी सभागृहात म्हटले की, बीड शहरात १५० पेक्षा जास्त भूखंड आरक्षित आहेत. तेथील घोटाळ्यांचा तपशीलवार अभ्यास दोन महिन्यांत समितीमार्फत केला जाईल.अहवाल आल्यानंतर आमदार क्षीरसागर यांच्यासोबत मंत्रालयात बैठक घेऊन दोषींवर कारवाई करू. चुकीचा लेआउट मंजूर करणाऱ्यांवर आणि भूमाफियांना मदत करणाऱ्यांवर कठोर पावले उचलू.

### दैनिक विश्वनायक ने सातत्याने केला होता पाठपुरावा...

नगरपालिके अंतर्गत बोगस गुंठेवारीचा मोठ्या प्रमाणात घोळ होत असल्याबाबतची माहिती मिळाल्यानंतर दैनिक विश्वनायक ने गेल्या सहा महिन्या पासून या विरोधात सातत्याने आवाज उठविला होता. आरक्षित जाग्यावर बोगस गुंठेवारी करण्यात आली असून यामध्ये कोट्यावधींचा व्यवहार झाला आहे, नगरपालिकेतील अधिकारी आणि काही कर्मचारी, खाजगी व्यक्ती आणि संस्था सोबतच काही सेवानिवृत्त आणि निलंबित झालेले अधिकारी सहभागी असल्याबाबतचा खुलासा दैनिक विश्वनायक ने वेळोवेळी केला होता. याबाबतचे पुरावे सुद्धा दैनिक विश्वनायककडून जनतेसमोर मांडण्यात आले होते. यामध्ये दोषी असलेल्यावची चौकशी व्हावी आणि कारवाई व्हावी अशी मागणी लावून धरण्यात आली होती. अखेर या मोहिमेला यश आले असून, आमदार संदीप क्षीरसागर यांनी सबंध बीडकरांच्या हक्काचा आणि जिव्हाळ्याचा प्रश्न लक्षवेधीच्या माध्यमातून मांडत भ्रष्ट यंत्रणेला जोरदार धनकार दिला आहे. आता त्यांच्यावर कारवाईची प्रतीक्षा आहे.





### इतर विभागातील भ्रष्टाचारही चव्हाट्यावर आणणार

नगरपालिकेच्या विविध विभागामध्ये वेगवेगळ्या पद्धतीने भ्रष्टाचार झालेला आहे. बांधकाम विभागात तर भ्रष्टाचाराने कळस गाठला आहे. इथे काम करणारे अधिकारी काही कर्मचारी यांनी वेगवेगळ्या पद्धतीने कोट्यावधींचे बोगस बिले काढली आहे. ज्या ज्या ठिकाणी भ्रष्टाचार झाला आहे ते सगळे चव्हाट्यावर आणण्याचे काम दैनिक विश्वनायक यापुढे करणार आहे.

### बोगस गुंठेवारी करणारे आणि करून देणारे सगळेच अडकणार

नगरपालिकेमध्ये बोगस गुंठेवारी चे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. लक्षवेधीच्या माध्यमातून जेवढा भाग समोर आला त्याहीपेक्षा अधिक मोठ्या प्रमाणात गुंठेवारी झालेली आहे. यामध्ये नगरपालिकेतील काही अधिकारी आणि कर्मचारी सक्रिय सहभागी आहेत. शिवाय मोठ्या प्रमाणात खाजगी व्यक्तींचा समावेश आहे. मात्र दोन महिन्याच्या चौकशीतून बऱ्याच बाबी समोर येणार आहेत. त्यामुळे बोगस गुंठेवारी करून देणारे आणि करून घेणारे हे सगळेच यात अडकणार आहेत.

### बीड नगरपालिकेची बोगस गुंठेवारी विधानसभेत गाजली,भूमाफिया,प्रशासन गठजोड उघड झाली



परळी (प्रतिनिधी)

रमा नगर येथे १४ जुलै २०२५, रोजी रमाई घरकुल योजनेच्या छत.भरणीच्या कार्यक्रमात महेश किसनराव मस्के यांच्या कार्यक्रमास नवीन घराचे छत भरण्याच्या प्रसंगी श्रीफळ फूडण्याची प्रथा पाळली गेली.कार्यक्रमात माजी नगराध्यक्ष बाजीराव (भैया) धर्माधिकारी, माजी नगरसेवक नितीन रोड, भारत ताटे, राज जगतकर, सुरज ताटे, आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्व उपस्थितांनी घरकुल योजनेच्या लाभार्थ्याला शुभेच्छा दिल्या आणि योजनेच्या यशस्वी राबविण्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. याप्रसंगी संपूर्ण मस्के कुटुंबीय सहभागी होते.

# आंदोलन करण्याचा इशारा शेख सलमान शेख सईद

बीड : अंजुमन ए-इंशात-ए-तालीम शिक्षण संस्था, बीड संचलित मिल्लीया माध्यमिक शाळा (मुलींची), बीड मध्ये सर्व मुली शिक्षण घेत आहेत. सदरील शाळे मध्ये यापुर्वी शिक्षक व शिक्षीकांचे अश्लिल व्हीडीओ बाहेर येऊन संस्थेची व संस्थाअंतर्गत शाळेची संपूर्ण महाराष्ट्रा मध्ये बदनामी झाली होती. त्याचा शाळे मधील मुलींच्या बाल मनावर वाईट परिणाम झालेला आहे. सदरील प्रकरणाला काही महिनेच झालेले असताना राज्य भरा मध्ये दररोज शाळकरी मुलींची छेड काढणे, विनयभंग करणे किंवा अतिप्रसंग करण्या सारखे प्रकार घडत आहेत. अशातच अंजुमन ए-ईशात-ए-तालीम शिक्षण संस्था, बीड संचलित मिल्लीया माध्यमिक शाळा (मुलींची), बीड या शाळे मध्ये पुरुष शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी असुन वॉचमेन देखील पुरुष आहे. यामुळे पुन्हा एकदा या शाळे मधील मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. सदरील मुलींच्या शाळे मध्ये सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा स्टाफ हा महिलांचा असायला हवा आहे. जेणे करुन मुलींची छेड काढणे, विनयभंग करणे अशा प्रकारच्या घटनांना आळा बसेल.

सध्या बीड जिल्ह्या मध्ये दिवसेंदिवस मुलींच्या सुरक्षेविषयी प्रश्न गंभीर होताना दिसुन येत आहे, तसेच या मुलींच्या शाळेमध्ये यापुर्वी घडलेल्या प्रकारामुळे सदरील शाळे मध्ये मुलींना शिक्षणासाठी पाठविण्यासाठी पालकांमध्ये भिती निर्माण झालेली आहे, त्यामुळे मुलींचे शैक्षणिक नुकसान होत आहे.सदरील मुलींच्या शाळे मध्ये पुरुष स्टाफ असणे हा अत्यंत गंभीर प्रश्न असुन त्याकडे प्रशासनाने लक्ष केंद्रीत करुन मुलींच्या भवितव्याचा विचार करुन व त्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन सदरील शाळे मधील पुरुष शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच वॉचमन यांना दुसऱ्या ठिकाणी बदली करुन त्यांचे जागी फक्त महिलांचा स्टाफ रुजु करण्याची मागणी मा. शिक्षणाधिकारी (मा.), जि.प.बीड यांना पत्राव्दारे शेख सलमान शेख सईद यांनी केली आहे, १५ दिवसात कार्यवाही न झाल्यास दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हा परिषद कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तिव्र आंदोलन करण्याचा इशारा देखील या पत्रकात देण्यात आला आहे अशी माहिती प्रसिध्दी पत्रकात देण्यात आली,




## समाज सेवक ज़की बाबा सोशल वेलफेयर फांउडेशन व पल्स केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त




### विद्यमानाने मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषध वाटप शिबीर संपन

(दि.१३/७/२०२५, माजलगाव): समाज सेवक *जकी बाबा फांउडेशन* व *पल्स केअर हॉस्पिटल* यांच्या संयुक्त विद्यमानाने एक मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषध वाटप कार्यक्रम मिस्कीन स्वामी मठ संस्थान,मोगल मोहल्ला ज़की बाबा चौक माजलगांव येथे आयोजित करण्यात आला होता, या उपक्रमात गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी वैद्यकीय तपासणी, उपचार आणि मोफत औषधे पुरवण्यात आली, सर्व समाजातिल ३८४ रुग्णांनी या शिबाराचा लाभ घेतलला,

या कार्यक्रम चा उद्घाटन मौलाना महेबुब साहेब व डॉ.चंद्रकांत स्वामी यांच्या हस्ते करण्यात आला,या कार्यक्रमात उपस्थित डॉ.तौसिफ शेख एम.डी.मेडिसिन,डॉ.पदमा चव्हान (स्त्रीरोग तज्ञ), डॉ.आफरिन शेख,ज़की बाबा फाउंडेशन चे अध्यक्ष शौकत शेख, उपाध्यक्ष इरफान मिर्झा (बेग), सचिव सलिम शेख, ज़मीर शेख,शाहेद मनियार, सय्यद खेसर,असद सर,जुल्फेखार शेख,फारोक शेख, अविनाष कांडुरे, बाळ लांडगे,खदीर शेख,हामिद मिर्झा,सादेक शेख, सत्तार बेग,मनमत अप्पा,आरेफ शेख,मन्सुर बेग,मकसुद शेख,फैसल चाऊस,आवद चाऊस,सालम चाऊस,इतापे, अंकुश राव नसिर शेख,हे उपस्थित होत

कार्यक्रमात सहभागी झालेले रुग्ण म्हणाले, माझ्यासारख्या शेतमजुरांना डॉक्टरांची तपासणी आणि औषधे मोफत मिळाली हे खूप मोलाचे आहे. या संस्थांना धन्यवाद! हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनवर शेख,वसिम मिर्झा,आमिन शेख,फहिम शेख,शाहेद सय्यद,महेमुद शेख,यावर शेख,नाजेर शेख,यासेर शेख,ग़ज़मफर शेख,शहाज़ेद खान,फेरोज़ सय्यद,बबलू शेख, शारूख सय्यद, गुड्डू लाला,शफिक शेख, आज्जु शेख,आमेर शेख,समीर, नासेर शेख,जुबेर शेख,जर्रार,फहाद चाउस,जैऩ चाऊस, मोहम्मद, आम्मार,उमर,सोफियान, इब्राहिम, इमरान,फैसल,साहिल या लोकांनी परिश्रम घेतला

# के. एन. मराठी उर्दु प्रा. माध्य. शाळेत गणवेश वाटप

शिराढोण ता. कळंब येतील हिंदुस्थानी एज्युकेशन सोसायटी औसा संचलित खाजा नसरुद्दीन मराठी उर्दू प्राथमिक माध्यमिक शाळा येथे आज मान्यवरांच्या उपस्थितीत इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री गुणवंत घोगरे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून गावच्या कर्तव्यदक्ष सरपंच श्रीमती लक्ष्मीताई म्हेत्रे,माजी जिल्हा परिषद सदस्य शहाजी दादा पाटील, लाडकी बहीण योजना कळंब तालुकाध्यक्ष श्री नितीन आबा पाटील, ग्रामपंचायत उपसरपंच अमोल माकोडे, माजी पंचायत समिती सदस्य राजेश्वर जी पाटील, सोसायटीचे चेअरमन श्री नासीर भाई पठाण, ग्रामपंचायत सदस्य एडवोकेट नितीन भैय्या पाटील श्रीमती बेबी नंदा गोरे,उर्दु प्राथमिक च्या मुख्याध्यापिका डांगे सुरैया सामाजिक कार्यकर्ते अवधूत पाटील, जागृत पालक सुनील बोंदार्डे,बाळू मुदडा,बाळासाहेब खडबडे, सरफराज शेख, गोवर्धन जोशी, चंद्रमणी नाईकवाडे, बबलू नाईकवाडी, गणेश निकम, अमोल यादव , विठ्ठल वाघमारे, हुर पाशा शेख,प्रगतशील शेतकरी अशोक जाधव सादिक भाई पठाण पत्रकार अमोलसिंहचंदील, रंजीत गवळी, बाशीद भाई शेख, राहुल पाटील,तर माता पालक नौशाद शेख, जाहिरा शेख, शबाना भेटीकर, सभा काजी, आसमा काजी, शाईनाज डांगे, हसीना डांगे, पार्वती नाईकवाडे इत्यादी मान्यवरांच्या हस्ते शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आला. याप्रसंगी शहाजी दादा पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक घोगरे सर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात शाळा गुणवत्तेच्या दिशेने कशी वाटचाल करत आहे याबद्दल माहिती सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाऊसाहेब साळुंखे यांनी केले तर उपस्थितांचे आभार दिलखुश मुलानी यांनी मानले,. तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राथमिकचे मुख्याध्यापक चंद्रकांत महाजन आणि शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# प्रवीण गायकवाड यांच्यावरील हल्ल्याच्या दोषींना तात्काळ अटक करुण मुख्यमंत्री यांनी राजीनामा द्यावा-भाई ॲड नारायण गोले पाटील

माजलगाव (प्रतिनिधी)

अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे नेते प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर काल झालेल्या हल्ल्याची घटना ही खूप मोठा कट असू शकते, त्यामुळे यातील दोषी सह या कटाचा मुख्य सूत्रधार कोण आहे यांचा तपास करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावे तसेच गेल्या अनेक दिवसात महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्थेचे तीन तेरा वाजले असून महाराष्ट्रात आराजक माजले आहे, राज्याचे गृहमंत्री, मुख्यमंत्री हे कायदा सुव्यवस्था अबाधित राखू शकले नसल्याच्या नैतिकतेतुन त्यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना दिलेल्या निवेदनाद्वारे शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांनी केली आहे.




महाराष्ट्र हा फुले , आंबेडकर, शाहू, कर्मवीर, क्रांतिसिंह अण्णाभाऊ यांच्या पुरोगामी विचाराचा असून याच पुरोगामी महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांमध्ये अनेक विचारवंतांना गोळ्या घालून मारण्यात आले त्यात कॉम्रेड पानसरे, दाभोळकर, यांची यांचा उल्लेख करावा लागेल तर पुरोगामी विचारांचे भाजपच्या पिल्लावळींना इतके वावडे का ? असा सवाल करत, पुरोगामी विचाराच्या कार्यकर्त्यावर सातत्याने होत असलेले हल्ले भारतीय जनता पक्षांच्या पिलावळी या घडवून आणत आहेत, महाराष्ट्रात पुरोगामी विचारांच्या कार्यकर्त्यावर होत असलेले हल्ले पाहता फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारधारेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन्मान करण्यासाठी आपल्या मुख्यमंत्री, गृहमंत्री पदाचे तात्काळ राजीनामे द्यावेत अन्यथा शेतकरी कामगार पक्षाचे वतीने तीव्र आंदोलन उभे करण्याचा इशारा उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे भाई ड नारायण गोले पाटील यांच्यासह भाई श्रीराम शेवाळे, भाई मुंजा पांचाळ आदींनी दिला आहे.

# तेजस्विनी ग्रुप आयोजित पंचमी आणी राखीपौर्णिमा स्पेशल, बीड जिल्ह्यातील सर्वात मोठे एक्झिबिशन

**महिला उद्योजकांचे प्रदर्शन व विक्री एक्झिबिशनला उपस्थित राहा – सोनल पाटील**

बीड – तेजस्विनी ग्रुप

आयोजित खास पंचमी आणी राखीपौर्णिमा निमित्ताने महिला उद्योजकांचे प्रदर्शन व विक्री ज्यामध्ये बाहेर गावाहून जसे की संभाजीनगर, पुणे, जालना, लातूर, उस्मानाबाद, अंबाजोगाई , परळी, धुळे, शहादा अशा विविध ठिकाणाहून वेगवेगळे स्टॉल,तसे खवैय्या साठी खाण्याचे सुद्धा विविध चवदार व अप्रतिम आयटम , कपडे ,हेअर ऑईल, देवांची वस्त्रे ,सोप्स,साड्या ,मनमोहक पैठणी, कुर्तीज दोहोड ,लेडीज वेअर्स,स्टोल, ओढणी, बांगड्या, मोत्याचे साहित्य ,फ्रॉक्स ,चॉकलेट्स ,सर्व प्रकारच्या पर्सेस ,स्वेटर्स, शुद्ध तुप ,आगरबत्ती ,पंचगव्य ,नैसर्गिक हळद ,तिखटी,लोणचे, सर्व प्रकारच्या चटण्या ,खाद्य पदार्थ, ज्वेलरी, टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स, सौंदर्य प्रसाधने , सर्व प्रकारचा , प्रोडक्ट ,बॅटरी संवर्धन सोलार उर्जा प्रोडक्ट ई. व खुप काही...! असे आयोजन कॅनॉल रोड, रामकृष्ण लॉन्स येथे शनिवार आणी रविवार दिनांक १९ आणी २० जुलै २०२५ रोजी सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत केले आहे तरी एक्झिबिशनला सहकुटुंब भेट द्या व खरेदी करुन छोट्या व्यवसायिकांना प्रोत्साहन द्या असे आव्हान तेजस्विनी ग्रुप अध्यक्ष सोनल पाटील यांनी केले आहे



# खा. निलेश लंके यांच्या हस्ते लेखक दिग्दर्शक अल्ताफ शेख सन्मानित

**गणपतराव देशमुख यांच्यासोबत काम करायला मिळाले हे भाग्य – खा. लंके**

बीड (प्रतिनिधी)

जिल्ह्याचे जावई, सोलापूरचे भूमिपुत्र आणि पुणे येथे स्थायिक झालेले कर्मयोगी आबासाहेब चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांना खासदार निलेश लंके यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.हा पुरस्कार वितरण सोहळा मातृभूमी सोशल फाउंडेशन, झेप फाउंडेशन, कांताभाऊ राठोड आणि अशोक पाटील यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यात सामाजिक, शिक्षण आणि कला क्षेत्रात काम करणाऱ्या विशेष व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. शेतकरी कामगार पक्षाचे आजीवन सदस्य, सांगोला विधानसभा मतदारसंघाचे ११ वेळा सदस्य आणि राज्याच्या मंत्रिमंडळात दोन वेळा मंत्री राहिलेले गणपतराव उर्फ आबासाहेब देशमुख यांच्या जीवनावर आधारित कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाचे उत्कृष्ट लेखन आणि दिग्दर्शन केलेले अल्ताफ दादासाहेब शेख यांना याच चित्रपटासाठी खासदार निलेश लंके यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

यावेळी पुणे चे उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, पोलीस उपायुक्त तथा बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र राहुल आवारे, सहाय्यक आयुक्त सुरेखा भणगे, कामगार अधिकारी साळुंखे, उपविभागीय अभियंता मोहन भदाणे, पोलीस निरीक्षक शरद झिंने यांच्यासह अन्य मान्यवरांची कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



यावेळी बोलताना खासदार निलेश लंके यांनी कर्मयोगी आबासाहेब चित्रपटाचे कौतुक केले. लेखक, दिग्दर्शक अल्ताफ शेख यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांनी दिवंगत गणपतराव देशमुख कसे होते आणि त्यांच्यासोबत कामाचा अनुभव सांगून गणपतराव देशमुख अर्थातच आबासाहेबांसारख्या सत्कर्मी व्यक्तिमत्त्वावर बायोपिक रूपात चित्रपट तयार करणे हे खरे म्हणजे आजच्या व्यावसायिक युगात मोठ्या धाडसाचे काम आहे. हे धाडसाचे काम लेखक, दिग्दर्शक अल्ताफ शेख यांनी केले याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे असेही खासदार लंके म्हणाले.

# जिल्हा परिषद उर्दू शाळेत रिक्त पदांवर तत्काळ नियुक्ती करा

**अन्यथा तीव्र आंदोलन करणार:-सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठान**

प्रतिनिधी (बीड)

जिल्हा परिषद उर्दू शाळेत रिक्तपदांवर तत्काळ नियुक्ती करा या मागणी साठी सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठान च्या शिष्टमंडळाने बीड जिल्हापरिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री जितिन रहमान व शिक्षण अधिकारी यांना भेटून लवकरात लवकर रिक्त पदांवर नियुक्ती करण्याची मागणी केली.जिल्हा परिषद बीड शिक्षण विभाग अंतर्गत जिल्ह्यात शेकडो उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरू आहे, यात अनेक उर्दू शाळेत, सहाय्यक शिक्षक, मुख्याध्यापक व इतर पदे रिक्त आहे, रिक्त पदांमुळे उर्दू भाषिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, या जिल्हा परिषद शाळेत, गरीब, गरजवंत व कामगारांचे पाल्य शिक्षण घेत आहे, शिक्षक नसल्याने अनेक शाळेतून पालकांनी आपल्या पाल्यांचे नाव वगळून खासगी शाळेत दाखला घेत आहेत, बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात जिल्हा परिषद उर्दू शाळेत पदे रिक्त आहेत मंजुरी असताना पदे रिक्त असणे दुर्दैवी आहेत. अनेक ठिकाणी नियुक्ती करून ही शिक्षक शाळेवर रुजू होत नाही. त्यामुळे शाळेतून पटसंख्या कमी होत




असल्याने उर्दू शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहे, उर्दू भाषिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने गुणवत्ता स्तर ढवळत चालला आहे. या प्रकरणी सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठान बीड च्या शिष्टमंडळाने मुख्य कार्यकारी अधिकारी श्री जितिन रहमान यांना भेटून लवकरात लवकर रिक्त पदांवर नियुक्ती करण्याची मागणी केली अन्यथा विद्यार्थी व पालकांना सोबत घेऊन जिल्हा परिषद इमारतीत शाळा भरवून लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करणार असा इशारा दिला.यावेळी सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष अरबाज पठाण सह प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# नगरपरिषद गार्डन समोरील गाळे मोकळे केले जाणार

**भाडेकरूंनी पोटभाडेकरू ठेवल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत असल्याने पालिकेचा निर्णय**

अंबाजोगाई/प्रतिनिधी

अंबाजोगाई नगर परिषदेच्या मुख्याधिकारी श्रीमती प्रियंका टोंगे यांनी शहर विकासासाठी अनेक योजना आखल्या असून त्या अमलात आणल्या जात आहेत. काही ठिकाणी प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात केली आहे.नगरपरिषद उद्यानासमोर मोठ्या प्रमाणात वाहनांची रेलचेल वाढली आहे. शिवाय गाळेधारकांनी स्वत:च्या दुकानासमोरच पोटभाडेकरू ठेवून त्यांच्याकडून मोठी रक्कम वसूल केली जात आहे. उद्यानासमोरील अस्ताव्यस्त वाहतूक थांबवण्यासाठी हे गाळे मोकळे करून ती जागा नगरपरिषद ताब्यात घेणार आहे. सर्वच गाळेधारकांचा करार संपला असून येत्या आठ दिवसात ही कारवाई होणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, योगेश्वरी उद्यान हे मधल्या काळात मोडकळीस आले होते. वारंवार दुरुस्ती केली जायची आणि ठेकेदारामार्फत हे गार्डन चालवायला दिले जायचे पण तत्कालीन मुख्याधिकारी व प्रशासक डॉ.उत्कर्ष गुट्टे यांनी हे उद्यान सुशोभित करून नागरिकांना व लहान मुलांना उपलब्ध करून दिले त्यांच्यानंतर मुख्याधिकारी गुट्टे यांची बदली झाली त्याजागी श्रीमती प्रियंका टोंगे या मुख्याधिकारी व प्रशासक म्हणून रुजू झाल्या. उद्यानाला गत वैभव मिळवून देण्यासाठी श्रीमती टोंगे यांचाही प्रयत्न आहे. दररोज सायंकाळी चार ते रात्री आठ वाजेपर्यंत शेकडो वयोवृद्ध आजी – आजोबा आणि लहान लहान चिमुकले येऊन गार्डनमध्ये खेळतात व आनंद घेतात. दररोज संख्या वाढते आहे. शहरात इतर विरंगुळाची साधने आणि ठिकाणी नाहीत म्हणून योगेश्वरी उद्यानामध्ये दिवसेंदिवस गर्दी वाढते आहे. त्या ठिकाणी वाढती गर्दी लक्षात घेता आणि वाहनांची सुमार गर्दी पाहून मुख्याधिकारी श्रीमती प्रियंका टोंगे यांनी उद्यान परिसरात नगर परिषदेने २५ वर्षांपूर्वी उभारलेले पत्र्याचे गाळे मोकळे करून त्या ठिकाणी पार्किंग करण्याची योजना आखल्याची माहिती आहे.कारण २५ वर्षांपूर्वी हे गाळे केवळ ३५ हजार रुपयांच्या डिपॉझिटमध्ये अल्पशा भाड्यावर देण्यात आले होते. या गाळ्यांची व मालकीची मुदत संपलेली आहे. मुदत संपली तरी गाळेधारक गाळे सोडण्यास तयार नाहीत म्हणून हे गाळे पोलीस फौजफाटा वापरून मोकळे केले जाणार आहेत. गाळेधारकांना अल्पशे भाडे नगरपरिषदेला द्यावे लागते. मात्र गाळेधारकांनी शकल लढवत स्वत:च्या गाळ्या पुढे पोटभाडेकरू नेमून त्याच्याकडून किमान दहा ते बारा हजार रुपये भाडे दर महिन्याला आकारले जाते. असे जवळपास त्या ठिकाणी १८ गाडे आहेत. प्रत्येक गाळा हा दहा बाय दहा साईजचा आहे.सध्या प्रत्येकी १८०० रुपये प्रति महिना गाळेधारक नगर परिषदेला भरतात. मात्र पोटभाडेकरूकडून मोठ्या रकमा घेऊन भाड्याने दिले जाते.पोटभाडेकरूमुळे त्या परिसरात वाहतुकीचा बट्ट्याबोळ झाल्याची तक्रार अनेकांनी नगरपरिषदेकडे व उपजिल्हाधिकाऱ्याकडे नोंदवली आहे. शिवाय वयस्कर मंडळींना व महिला भगिनींना गार्डनमध्ये जाण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते म्हणून श्रीमती प्रियंका टोंगे यांनी हे सदरील गाळे मोकळे करून त्या ठिकाणी पार्किंगची योजना आखली असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. त्यामुळे रस्ता रस्ता मोकळा श्वास घेईल आणि वयोवृद्ध व लहान चिमुकल्यांची परवड होणार नाही.

हे गाळे मोकळे करण्याची प्रक्रिया पुढील आठवड्यात राबवली जाणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. हे गाळे मोकळे करून ही जागा ताब्यात घेण्याचे आदेश स्वच्छता निरीक्षक तथा अतिक्रमण विभाग प्रमुख अनंत वेडे यांना दिले असल्याचे समजते.

# होळ येथील राशन दुकानातून टेम्पोने आणलेले धान्य धारूरमध्ये पकडले!

**पोलिसांची कारवाई; राशन दुकानदार अशोक घुगेकडून माल आणल्याची पंचनाम्यात कबुली**

किल्ले धारूर/प्रतिनिधी

दि.१४ : केज तालुक्यातील होळ येथील राशन दुकानातून टेम्पोने काळ्या बाजारात विक्रीसाठी जात असलेला गहू पोलिसांनी पाठलाग करून धारूर शहरातील एका दुकानासमोर पकडला. ही कारवाई पोलिसांनी सोमवारी (दि.१४) दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास केली. याचा पंचनामा सुरू असून पुढील कार्यवाही केली जाईल, अशी माहिती धारुरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी दिली आहे. दरम्यान, सदरील धान्य होळ येथील राशन दुकानदार अशोक तुकाराम घुगे याच्याकडून विक्रीसाठी आणल्याची कबुली वाहनचालकाने दिली आहे.

आडस येथील चौकात उभे असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना आडसमधून धारूरच्या दिशेने जात असलेला छोटा टेम्पो (क्र.एम.एच. ४४ यू २२५७) दिसून आला. पोलिसांना संशयास्पद वाटल्याने त्याचा पाठलाग केला. तेव्हा धारूरमधील एका धान्याच्या दुकानासमोर टेम्पो उभा दिसून आला. यावेळी पोलिसांनी चौकशी केली असताना चालकाने त्याचे नाव इब्राहिम खाजा (रा.धारुर) असे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडे केलेल्या चौकशीत धान्याच्या कसल्याही पावत्या आढळून आल्या नाहीत, तसेच सदरील धान्य राशनचे असल्याचा संशय आल्यावरून पंचनामा केला. यावेळी वाहन चालकाने होळ येथील राशन दुकानदार अशोक तुकाराम घुगे याच्याकडून माल घेऊन धारूरच्या मोंढ्यात विक्रीसाठी देत असल्याची कबुली पंचनाम्यात दिली. सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांच्या उपस्थितीत केलेल्या पाहणीत अंदाजे ४० ते ५० गोण्या गहू आढळून आला असून सुमारे २५ क्विंटलहून अधिक धान्य असल्याची माहिती आहे. पुढील कार्यवाहीसाठी पुरवठा विभागाला अहवाल दिला जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.




**कठोर कारवाईशिवाय राशन माफियांना बसणार नाही चाप**

राशन दुकानातून सर्रासपणे काळ्या बाजारात स्वस्त धान्याची विक्री करण्याचे गैरप्रकार वाढले आहेत. याकडे जिल्हा पुरवठा विभागाने लक्ष देण्याची गरज आहे. तसेच, याप्रकरणात पोलिसांनी गतीने कारवाई केली असून आता पुरवठा विभागानेही कठोर कार्यवाही केल्याशिवाय राशनमाफियांना चाप बसणार नाही.



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील कानडी माळी येथील कानेश्वर विद्यालय, येथे १९९९-२००० इयत्ता १० वी बॅचचे स्नेह मिलन संपन्न झाले. वर्षा मागून वर्ष सरत जातात शिक्षण करियर लक्ष नोकरी या साऱ्या धकाधकीच्या जीवनात शाळा कॉलेजमधले वर्गमित्र मैत्रिणी ही अक्षरशः विखुरले जातात कित्येक वर्ष तर भेटही होत नाही फोन तर दूर.. कुठे असेल आता तो.. कुठे असेल आता ती.. हा प्रश्न सतत मनाला छळत असतो मात्र काळजा मधून आठवणी पुसत नाहीत.. आणि मग सोशल मीडियावर शोध सुरू होतो. त्या सर्व बालदोस्तांचा आणि भरतो कार्यक्रम गेट-टुगेदरचा शाळेतल्या त्या मस्त आठवणी सरांच रागावणं, चिडणं, मारणं, चोरून डबा खाणं आठवतं आणि आठवतात एकमेकांना चिडवायच्या कितीतरी गोष्टी आणि मग उजाडतो तो गेट-टुगेदर चा दिवस आणि सुरू होते मौज मजा आणि आठवणींची हिरवळ कार्यक्रमाची.. आनंदाचे क्षण पुन्हा जगूया जुन्या आठवणींना जावूया शाळेच्या अंगणात फुलवलेली ती मौजमजा आज पुन्हा अनुभवूया चला मित्रांच्या गलक्यात हरवून जाऊया.. आजचा हा गेट-टुगेदर चा दिवस प्रत्येकासाठी खासच असतो कारण सगळेजण तर भेटणार असतात पण वर्गातल्या बेंचवर जगलेल्या आठवणी सुद्धा भेटणार असतात.मांगल्याचा नवचैतन्याचा आणि केलेल्या आठवणी सुद्धा हा नवचैतन्याचा आणि हर्षाचा प्रकाश आनंद घेऊन आला आहे या कार्यक्रमाचे अध्यक्ष गरडे सर , मुख्याध्यापक ,कानेश्वर विद्यालय , कानडीमाळी . यांची उपस्थिती होती तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील ज्येष्ठ शिक्षक गवळी सर, गीते सर, खाडे सर,गिरी सर , मुख्याध्यापक, जि .प .उच्च प्राथमिक शाळा , कानडी माळी . श्रीमती शेळके मॅडम व आदर्श शिक्षक नरहरी काकडे सर उपस्थित होते. यावेळी मुलांनी शाळेतील त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला तसेच त्यांच्या जीवनातील शिक्षकांचा योगदान याबद्दल मनोगतही व्यक्त केले यावेळी सुधीर नाईकनवरे, सुनील राऊत, अनुराधा शिंदे, वंदना शिंदे, महादेव मस्के, विनोद राऊत, जालिंदर राऊत, मनोज काळे, माधव वाघमारे, सोनाजी काकडे यांनी आपल्या मनोगतातून शाळेच्या गुरुजनांच्या प्रति आपली कृतज्ञता व्यक्त केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक श्री नरहरी काकडे सर यांची खूप मदत झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर नाईकनवरे यांनी केले व आभार प्रदर्शन श्री काकडे सर यांनी केले.

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड – ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com